CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई ।
बुधवार, ३१ जुलै २०२४

# ‘पीएम आवास’च्या खोट्या जाहिराती

नवी मुंबई : सिडको महामंडळामार्फत नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या सदनिकांच्या विक्रीसाठी सिडकोने कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नसताना, काही व्यक्तींकडून समाज माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजने संदर्भात चुकीची माहिती प्रसारित करून नागरिकांची दिशाभूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा खोट्या व चुकीच्या जाहिराती, योजनांना बळी पडू नये, असे आवाहन सिडकोने केले आहे.

सिडकोच्या वतीने नवी मुंबईतील वाशी, जुईनगर, कोपरखैरणे, खारघर, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व उलवे या भागात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. सिडकोमार्फत या सदनिकांच्या विक्रीची गृहनिर्माण योजना अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




लोकमत

Hello Navi Mumbai
Page No. 1 Jul 31, 2024

# 'गृहयोजनेच्या अफवांकडे दुर्लक्ष करा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडकोच्या प्रस्तावित गृहयोजनेविषयी समाज माध्यमांतून विविध प्रकारच्या पोस्ट व्हायरल होत आहे. या निव्वळ अफवा असून, त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सिडकोने केले आहे. सिडकोच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर घरांची योजना जाहीर केली जाणार आहे. या योजनेतील घरांसाठी अर्ज नोंदणी सुरू झाल्याचे वृत्त प्रसारित होत आहे. त्याअनुषंगाने सिडकोने या संदर्भातील भूमिका स्पष्ट केली आहे.

सिडकोने घरांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्राची अथवा खासगी एजन्सीची नेमणूक केलेली नाही. त्यामुळे खासगी संस्था किंवा व्यक्तींच्या मार्फत पसरविण्यात येणाऱ्या खोट्या जाहिरातीला बळी पडू नये. यातून फसवणूक झाल्यास त्याला सिडको जबाबदार राहणार नाही, असेही स्पष्ट केले आहे. तसेच, गृहविक्री योजनेविषयी अशाप्रकारच्या खोट्या बातम्या निदर्शनास आल्यास सिडकोच्या दक्षता विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहनही केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

# सकाळ

मुंबई, बुधवार, ३१ जुलै २०२४

## सिडकोतर्फे अफवांना बळी न पडण्याचे आवाहन

नवी मुंबई, ता. ३० (वार्ताहर) : खासगी व्यक्तींकडून समाज माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजने संदर्भात चुकीची माहिती प्रसारित करून नागरिकांची दिशाभूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्यामार्फत पसरविण्यात येत असलेल्या खोट्या व चुकीच्या जाहिराती, योजनांना बळी पडू नये, असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

सिडकोच्या वतीने नवी मुंबईतील वाशी, जुईनगर, कोपरखैरणे, खारघर, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व उलवे या भागात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. सिडकोमार्फत या सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच सिडको महामंडळाने या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. मात्र काही खासगी व्यक्तीं व संस्थामार्फत सदनिकांच्या विक्रीबाबत खोट्या व चुकीच्या जाहिराती समाज माध्यमांद्वारे पसरविण्यात येत आहेत.

पुण्य नगरी बुधवार, ३१ जुलै २०२४ । मुंबई

# नागरिकांनो, अफवांना बळी पडू नका!

## गृहनिर्माण योजनेबाबत सिडकोचे आवाहन



। **नवी मुंबई** : सिडकोच्या वतीने नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप सिडकोमार्फत सादर करण्यात आलेली नाही. परंतु काही सामाजिक माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजनेसंदर्भात चुकीची माहिती प्रसारित होत आहे. त्यामुळे या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. याबाबत खासगी व्यक्ती किंवा संस्थांमार्फत पसरवण्यात येणाऱ्या खोट्या व चुकीच्या जाहिराती तसेच योजनांना बळी पडू नये, असे आवाहन सिडकोतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास सिडकोच्या दक्षता विभाग, ६ वा मजला यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तसेच सिडकोमार्फत जाहीर करण्यात येणाऱ्या योजनेबाबत अधिकची माहिती हवी असल्यास किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी निवारा केंद्र, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्थानक किंवा पणन (गृहनिर्माण) विभाग, ३ रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**प्रहार** मुंबई | बुधवार, ३१ जुलै २०२४

### सिडकोकडून नागरिकांना आवाहन

# 'सिडकोच्या महागृहनिर्माणविषयीच्या अफवांना बळी पडू नका'




**पनवेल (वार्ताहर):**

डकोच्या महागृहनिर्माणविषयीच्या सरवल्या जाणाऱ्या अफवांना ळी पडू नका, असे आवाहन डकोकडून करण्यात आले ाहे. सिडको महामंडळामार्फत वी मुंबईतील विविध ठिकाणी धानमंत्री आवास योजनेअंतर्गत दनिका बांधण्यात येत आहेत. सदर दनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण जना अद्याप सिडकोमार्फत सादर रण्यात आलेली नाही. परंतु काही ामाजिक माध्यमांद्वारे सिडको हागृहनिर्माण योजने संदर्भात नतेमध्ये चुकीची माहिती प्रसारित त असल्याचे निदर्शनास येत ाहे. सिडको महामंडळाने या दनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही वा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक लेली नाही. याबाबत खासगी क्ती किंवा संस्था यांच्यामार्फत सरविण्यात येणाऱ्या खोट्या व चुकीच्या जाहीराती/योजना/बातम्या यांना बळी पडू नये, असे सिडकोतर्फे जनतेस आवाहन करण्यात येत आहे. अशा अफवांना बळी पडून फसवणूक झाल्यास त्यास सिडको जबाबदार राहणार नाही, याची कृपया सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी. तसेच, अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास जनतेनी कृपया सिडकोच्या दक्षता विभाग, ६ वा मजला, सिडको भवन यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तसेच सिडकोमार्फत जाहीर करण्यात येणाऱ्या योजनेबाबत अधिकची माहिती हवी असल्यास किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी लोकांनी निवारा केंद्र, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्थानक, नवी मुंबई किंवा पणन (गृहनिर्माण) विभाग, ३ रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, ही विनंती.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवराष्ट्र | मुंबई, ३१ जुलै २०२४

# महागृहनिर्माण योजनांविषयीच्या अफवांना बळी पडू नका

नवी मुंबई, (वा.) सिडको महामंडळामार्फत नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. सदर सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप सिडकोमार्फत सादर करण्यात आलेली नाही. परंतु काही सामाजिक माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजने संदर्भात जनतेमध्ये चुकीची माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

सिडको महामंडळाने या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. याबाबत खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्यामार्फत पसरविण्यात येणाऱ्या खोट्या व चुकीच्या जाहीराती/योजना/बातम्या यांना बळी पडू नये, असे सिडकोतर्फे जनतेस आवाहन करण्यात येत आहे. अशा अफवांना बळी पडून फसवणूक झाल्यास त्यास सिडको जबाबदार राहणार नाही, याची कृपया सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.




तसेच, अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास जनतेनी कृपया सिडकोच्या दक्षता विभाग, ६ वा मजला, सिडको भवन यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तसेच सिडकोमार्फत जाहीर करण्यात येणाऱ्या योजनेबाबत अधिकची माहिती हवी असल्यास किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी लोकांनी निवारा केंद्र, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्थानक, नवी मुंबई किंवा पणन (गृहनिर्माण) विभाग, ३ रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट द्यावी असे आवाहन सिडकोने केले आहे.

# नवभारत

मुंबई, बुधवार 31 जुलाई 2024

**QUICK NEWS**

## फैलाई जा रही अफवाहों पर ध्यान न दें

**नवी मुंबई.** सिडको के माध्यम से नवी मुंबई में विभिन्न स्थानों पर प्रधानमंत्री आवास योजना के तहत फ्लैटों का निर्माण किया जा रहा है. सिडको द्वारा अभी तक इन फ्लैटों की बिक्री के लिए कोई योजना नहीं बनाई गई है. लेकिन कुछ सोशल मीडिया के माध्यम से सिडको महागृह निर्माण योजना के संबंध में जनता के बीच गलत जानकारी प्रसारित की जा रही है. इन फ्लैटों की बिक्री के लिए सिडको ने कोई सेवा केंद्र या एजेंसी नियुक्त नहीं की है. इस संबंध में सिडको जनता से अपील की है कि वे निजी व्यक्तियों या संगठनों द्वारा फैलाए गए झूठ और गलत विज्ञापनों, योजनाओं या समाचारों का शिकार न बनें. सिडको ने कहा है कि यदि कोई अफवाहों के शिकार होता है तो सिडको जिम्मेदार नहीं होगा. अगर ऐसी कोई फर्जी खबर या जानकारी सामने आती है, तो सिडको के सतर्कता विभाग से शिकायत करें.

**मेगा हाउसिंग योजनाओं के बारे में एजेंसी की नियुक्ति नहीं**

नवे शहर ▫ बुधवार, ३१ जुलै २०२४ ▫

# सिडको महागृहनिर्माण योजनांविषयी अफवांना बळी पडू नका

## 'सिडको'चे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई :** 'सिडको'मार्फत नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. सदर सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप 'सिडको'मार्फत सादर करण्यात आलेली नाही. परंतु, काही सामाजिक माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजना संदर्भात जनतेमध्ये चुकीची माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

'सिडको'ने या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. याबाबत खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्यामार्फत पसरविण्यात येणाऱ्या खोट्या आणि चुकीच्या जाहिराती, योजना, बातम्या यांना बळी पडू नये, असे आवाहन 'सिडको'तर्फे करण्यात आले आहे. अशा अफवांना बळी पडून फसवणूक झाल्यास त्यास सिडको जबाबदार राहणार नाही, असेही 'सिडको'तर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास जनतेनी कृपया 'सिडको'च्या दक्षता विभाग, ६ वा मजला, सिडको भवन यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तसेच 'सिडको'मार्फत जाहीर करण्यात येणाऱ्या योजनेबाबत अधिकची माहिती हवी असल्यास किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी लोकांनी निवारा केंद्र, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्थानक, नवी मुंबई किंवा पणन (गृहनिर्माण) विभाग, ३ रा मजला, रायगड भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, असे 'सिडको'तर्फे सांगण्यात आले आहे.




Hindustan Times
MUMBAI
WEDNESDAY
JULY 31, 2024

# CIDCO ISSUES WARNING ON FALSE HOUSING SALE ADS

Sameera Kapoor Munshi
htmumbai@hindustantimes.com

**NAVI MUMBAI:** The City Industrial and Development Corporation (CIDCO) has debunked widespread misinformation circulating on social media platforms regarding the sale of units constructed under its mass housing schemes. The public has been urged to be cautious of such false information, as CIDCO has not launched any housing scheme for sale purposes.

Officials have clarified that the construction of over 67,000 units under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) scheme is currently underway across various parts of the city. "It is important to note that none of the units constructed under this housing scheme are available for sale. Official announcements will be made on the CIDCO web portal if and when the sale begins. We urge the public to verify information through official channels to avoid confusion," said an official.

CIDCO clarified it has not appointed any service centre or agency for selling tenements, warning that any advertisements or schemes claiming otherwise are false. CIDCO will not be liable for financial losses from such schemes.

**Newsband** Wednesday, 31 July 2024

# CIDCO warns public about rumours and fraudulent schemes related to mass housing projects

**By Chandrashekhar Hendve**


The City and Industrial Development Corporation (CIDCO) has issued a cautionary note regarding misinformation circulating about its Mass Housing Schemes under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY). CIDCO emphasizes that no official housing scheme has been launched for the sale of these units as of now.

Recent reports of false advertisements and misleading schemes on social media have prompted CIDCO to appeal to the public to be vigilant and verify any information through official channels. CIDCO has not appointed any service centres or agencies for the sale of these tenements. Consequently, any financial losses incurred from fraudulent schemes or misinformation will not be the responsibility of CIDCO.

To avoid falling victim to scams, CIDCO advises the public to refer to its official website and social media platforms for accurate information. False information can be reported to CIDCO's Vigilance Department located on the 6th Floor of CIDCO Bhavan. For queries related to CIDCO's housing schemes or application processes, please visit the following official centres:




- Nivara Kendra, 7th Floor, Belapur Railway Station, Navi Mumbai
- Marketing (Housing) Department, 3rd Floor, Raigad Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai.




बुधवार, ३१ जुलै २०२४
लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# महागृहनिर्माण योजनांविषयी अफवांना बळी न पडण्याचे सिडकोचे आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल :** सिडको महामंडळामार्फत नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधण्यात येत असून या सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप सिडकोमार्फत सादर करण्यात आलेली नाही. परंतु काही समाजमाध्यमांवर सिडको महागृहनिर्माण योजनेत नागरिकांना चुकीची माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने सिडकोने अफवांना बळी पडू नका, असे आवाहन केले आहे.

सिडको महामंडळाने या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. याबाबत खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्यामार्फत पसरविण्यात येणा-या खोट्या व चुकीच्या जाहीराती/ योजना/ बातम्या यांना बळी पडू नये. तसेच अफवांना बळी पडून फसवणूक झाल्यास सिडको त्यास जबाबदार राहणार नाही असेही सिडकोच्या जनसंपर्क विभागाने स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास जागरुक नागरिकांनी सिडकोच्या दक्षता विभागाकडे संपर्क साधावा. गृहनिर्माण योजनेची अधिक माहिती किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असल्यास नागरिकांनी बेलापूर रेल्वेस्थानक येथील ७ व्या मजल्यावरील निवारा केंद्राला किंवा बेलापूर येथील रायगड भवन येथील तिस-या मजल्यावरील पणन विभागाला संपर्क साधण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.